POSTAL REGISTRATION : PLG/255/2026-2028

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष-०५ ● अंक-२५६ ● मुंबई, रविवार, १९ एप्रिल २०२६ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

# नाशिक टीसीएस कंपनीतील धर्मांतर प्रकरण

## महिला पोलीस अधिकारी कंपनीत 40 दिवस अंडरकव्हर म्हणून काम करत होत्या

**कंपनीकडे आवश्यक ते सीसीटीव्ही फुटेजची मागणी**

तपास पथकातर्फे कंपनीतील सीसीटीव्ही फुटेज तपासले जात असून, आरोपींची बँक हिस्ट्री देखील गोळा करण्यात येत आहे.त्यातून अनेक बाबींचा उलगडा होण्याची शक्यता आहे. एसआयटी पथकाने कंपनीकडे आवश्यक ते सीसीटीव्ही फुटेज मागितले आहे. त्याच बरोबर अटकेतील संशयितांची वैयक्तिक माहितीही जमा केली जात आहे. आरोपींनी पूर्वी एखाद्या कंपनीत काम केले असेल तर तेथेही असे प्रकार केले का ? त्यांच्याबद्दल तेथे काही तक्रारी होत्या का, याची पडताळणी केली जात आहे. त्यातून संबंधित आरोपींचे चारित्र्य तपासण्याशिवाय गुन्ह्यातील त्यांची मोडस ऑपरेंडी काय होती, याचाही उलगडा होऊ शकतो. दरम्यान, या कर्मचाऱ्यांवर योग्य ती कारवाई करावी, कंपनी अशा कृत्यांना पाठीशी घालणार नाही, असे व्यवस्थापनाने पोलिसांना कळविले असून, आरोपींना नोकरीतून तात्पुरत्या स्वरुपात निलंबित करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. माहितीनुसार शफी शेख, असिफ आफताब, शाहरुख कुरेशी, रजा मेमन, दानीश शेख, तौसिफ अत्तार हे सर्व सध्या कार्यालयीन कोठडीत आहे.

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

नाशिकमधील धर्मांतर प्रकरणी कंपनीतील संशयितांच्या बँक खात्यांची एसआयटीकडून चौकशी केली जात आहे. दरम्यान पोलिसांनी कशाप्रकारे या प्रकरणाचा भांडाफोड केला याची माहिती दिली आहे. कंपनीत लैंगिक अत्याचार सुरु असल्याची तक्रार मिळाल्यानंतर सहा महिला पोलीस अधिकारी अंडरकव्हर म्हणून गेल्या होत्या. या अधिकारी आरोपी कर्मचाऱ्यांच्या वागणुकीवर पाळत ठेवण्यासाठी 40 दिवस बीपीओमध्ये काम करत होत्या. अनेक कर्मचाऱ्यांकडून गैरवर्तन होत असल्याबाबत मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारेच ही कारवाई करण्यात आल्याचं पोलिसांनी सांगितलं आहे. ही मोहीम शहर पोलीस आयुक्त संदीप कर्णिक यांच्या देखरेखीखाली राबवण्यात आली.

**प्रकरण समोर कसं आलं?**

26 मार्चला सर्वात आधी हे प्रकरण समोर आलं. एका महिला कर्मचाऱ्याने देवळाली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. एका वरिष्ठ कर्मचाऱ्याने बलात्कार केल्याची तक्रार तिने केली होती. तपासादरम्यान, आणखी काही तक्रारी समोर आल्या. एका पुरुष कर्मचाऱ्यासह आणखी आठ कर्मचाऱ्यांनी मुंबई नाका पोलीस ठाण्यात धाव घेऊन, लैंगिक छळाचे आरोप केले. एकूणच, 26 मार्च ते 3 एप्रिल या कालावधीत आठ एफआयआर दाखल करण्यात आले.

**कोणते गुन्हे दाखल करण्यात आले?**

आरोपींवर वेगवेगळ्या कलमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. यामध्ये बलात्कार, लैंगिक छळ, पाठलाग करणं, विनयभंग आणि धार्मिक भावना दुखावणं यासारख्या आरोपांचा समावेश आहे. आठ आरोपींपैकी सात जणांना 7 एप्रिल रोजी अटक करण्यात आली. अटकेनंतर कंपनीने त्यांना कामावरुन काढून टाकलं. आठवा आरोपी एचआर आहे. पीडितांपैकी एकाने ई-मेलच्या माध्यमातून तक्रार केल्यानंतरही कारवाई न केल्याचा एचआरवर आरोप आहे.




**अंडरकव्हर टीमने नेमकं काय केलं?**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सहा महिला अधिकाऱ्यांनी कंपनीत रुजू झाल्यानंतर आरोपींवर लक्ष ठेवलं होतं. मीटिंग आणि कामाच्या ठिकाणी त्याच्या वागणुकीवर त्या बारकाईने लक्ष ठेवून होत्या. यादर्यान त्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नियमित संपर्कात होत्या. कामावरुन सुटल्यानंतर संपूर्ण माहिती अधिकाऱ्यांना दिली जात आहेत. विशेष तपास पथकाचे प्रमुख संदीप मितके यांनी, अत्यंत सुनियोजितपणे हे सर्व करण्यात आल्याचं सांगितलं आहे. यामुळे सुरुवातीला मिळालेल्या माहितीची सत्यता पडताळून पाहण्यास मदत झाली असं ते म्हणाले आहेत. अंडरकव्हर महिला अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीमुळे, आरोपांमधील तथ्याची पुष्टी करण्यात मदत झाली.

**बँक खात्यांची एसआयटीकडून चौकशी**


नाशिकमधील बहुराष्ट्रीय आयटी कंपनीतील धर्मांतरण प्रकरणी कंपनीतील संशयितांच्या बँक खात्यांची एसआयटीकडून चौकशी केली जात आहे. 2022 पासून आरोपींनी कट्टरतेचे जाळे विणल्याचा संशय आहे. महिला अत्याचार व धर्मांतर प्रयत्न प्रकरणी पोलिसांनी कठोरपणे तपास सुरु केला आहे. संशयितांना देशाबाहेरील व्यक्ती, संघटनांकडून फंडिंग होते का? याचा एसआयटी कडून तपास सुरू आहे. कंपनीमधील माजी कर्मचाऱ्याने धक्कादायक खुलासा केला आहे. विशिष्ट समुदायावर लक्ष असल्याचा आरोप त्याने केला आहे. आपले मनसुबे पूर्ण करण्यासाठी संशयित काम संपल्यावर घरी न जाता कंपनीत विशिष्ट हालचाली करायचे असा खुलासा त्याने केला आहे. काही महिलांना मानसिक दबावाखाली ठेवून हालचाली केल्याचा संशय आहे. ई-मेल, चॅट्स, कॉल रेकॉर्ड, धमक्या यांची पोलिसांकडून तपासणी सुरू आहे. कंपनीने चौकशीसाठी आरती सुब्रह्मण्यम यांच्या नेतृत्वाखाली विशेष समिती नेमली आहे. कंपनीने नाशिकमधील प्रकरण वेदनादायी असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

## "मूल होत नसेल तर पत्नीला माझ्याकडे पाठव"

### नाशिक टीसीएस मधील 'धर्मांतरण गँग'चा अमानवीय छळ!

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिक येथील टीसीएस शाखेत धर्मांतरण आणि लैंगिक शोषणाचे अत्यंत गंभीर आरोप समोर आले आहेत. या प्रकरणात पीडित महिलांनंतर आता एका पुरुष कर्मचाऱ्याने आपली आपबिती सांगितली असून, त्याने केलेले खुलासे अंगावर शहारे आणणारे आहेत. या कर्मचाऱ्याने सांगितले की, त्याला केवळ जबरदस्तीने टोपी घालण्यास आणि नमाज पठण करण्यास भाग पाडले गेले नाही, तर त्याच्या वैयक्तिक आयुष्याचाही क्रूर अपमान करण्यात आला. आरोपीने त्याला म्हटले की, "जर उपचार करूनही तुला मूल होत नसेल, तर तुझ्या पत्नीला माझ्याकडे पाठवून दे." अशा शब्दांत त्याचा मानसिक छळ करण्यात आला.




▶ **२०२२ पासून सुरू झाला छळाचा प्रवास :** पीडित कर्मचाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, हा छळ २०१२ मध्ये त्याने कंपनीत रुजू झाल्यापासून सुरू झाला होता. त्याचा टीम लीड तौसिफ अख्तर आणि त्याचा सहकारी दानिश शेख यांनी संगनमताने त्याला लक्ष्य केले. कामाच्या ठिकाणी आपल्या अटी मान्य करण्यासाठी ते सर्व कर्मचाऱ्यावर दबाव टाकत असत. जे कर्मचारी त्यांच्या धार्मिक अटी मान्य करत नसत, त्यांच्यावर कामाचा अतिरिक्त बोजा टाकून त्यांना त्रस्त केले जात होते.

▶ **महिला कर्मचाऱ्यांचे गंभीर आरोप आणि एफआयआर :** या प्रकरणात २३ वर्षीय महिला कर्मचाऱ्याने दाखल केलेल्या एफआयआरमध्ये तौसिफ आणि दानिश यांची नावे प्रामुख्याने आहेत. दानिशने पीडित महिलेला जबरदस्तीने चुंबन घेण्याचा प्रयत्न केला आणि लग्नासाठी दबाव टाकला. इतकेच नाही तर तौसिफ आणि एचआर निदा खान यांनी हिंदू देवी-देवतांबद्दल अत्यंत आक्षेपार्ह टिप्पण्या केल्याचा आरोपही या महिलेने केला आहे. या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी एका महिला अधिकाऱ्याला गुप्त एजंट म्हणून कंपनीत पाठवून तपास केला आहे.

▶ **सात आरोपींना अटक, पोलिसांकडून नऊ गुन्हे दाखल :** या प्रकरणात पोलिसांनी आतापर्यंत पाच पुरुष आणि दोन महिला अशा एकूण सात जणांना बेड्या ठोकल्या आहेत. अनेक महिला कर्मचाऱ्यांच्या तक्रारींनंतर पोलिसांनी या टोळीविरुद्ध एकूण नऊ गुन्हे दाखल केले आहेत. पीडित पुरुष कर्मचाऱ्याने सांगितले की, हे सर्व आरोपी वारंवार हिंदू धमार्चा अपमान करत असत आणि महाराष्ट्रातील आदरणीय महापुरुषांबद्दलही हीन दजार्ची विधाने करत असत.

▶ **शाकाहारी कर्मचाऱ्याला मांसाहार खाण्याची सक्ती :** धर्मांतराच्या या कटात कर्मचाऱ्यांच्या खाण्यापिण्याच्या सवयींवरही हल्ला करण्यात आला. पीडित कर्मचाऱ्याने सांगितले की, तो कट्टर शाकाहारी असूनही नाईट शिफ्ट संपल्यानंतर त्याला जबरदस्तीने हॉटेल्समध्ये नेले जायचे. तिथे त्याच्यावर मांसाहारी जेवण घेण्यासाठी दबाव टाकला जात असे. जेव्हा त्याने नकार दिला, तेव्हा त्याच्या धार्मिक श्रद्धेची चेष्टा केली जायची.

▶ **नमाज पठण आणि सोशल मीडियावर फोटो व्हायरल :** २०२३ च्या ईदच्या दिवशी तौसिफ याने पीडित कर्मचाऱ्याला आपल्या घरी नेले. तिथे त्याला जबरदस्तीने धार्मिक टोपी घालण्यास लावली आणि नमाज वाचायला लावला. इतक्यावरच न थांबता, त्याचे फोटो काढून त्याला अपमानित करण्यासाठी ऑफिसच्या अधिकृत व्हॉट्सॲप ग्रुपवर शेअर केले. जेव्हा पीडिताने या गोष्टीला विरोध केला, तेव्हा तौसिफने त्याला टेबल फॅन फेकून मारले आणि जीवे मारण्याची धमकी दिली.

▶ **'इस्लाम स्वीकारा तरच वडील बरे होतील' असा दावा :** जेव्हा पीडित कर्मचाऱ्याचे वडील अर्धांगवायूने (पॅरालिसिस) आजारी पडले, तेव्हा तौसिफ, दानिश, शाहरुख आणि रजा मेनन यांसारख्या लोकांनी त्याला इस्लाम स्वीकारण्याचा सल्ला दिला. ₹तू इस्लाम स्वीकारला तरच तुझे वडील बरे होतील,₹ असे त्यांनी सांगितले. पीडिताने त्यांचे ऐकले नाही, तेव्हा त्याच्याविरुद्ध कंपनीच्या मुख्य कार्यालयात खोट्या तक्रारी करून त्याला नोकरीवरून काढून टाकण्याचे षडयंत्र रचले गेले. हा छळ २३ मार्च २०२६ पर्यंत सुरू होता.

▶ **मैत्रीच्या नात्याचा गैरफायदा आणि मानसिक खच्चीकरण :** आरोपींनी सुरुवातीला मैत्रीचे नाते निर्माण केले आणि त्यानंतर हळूहळू आपला खरा हेतू स्पष्ट केला. पीडित कर्मचाऱ्याला वारंवार गळ्यातील रुद्राक्ष काढायला लावले आणि कलमा वाचायला लावला. त्याला मानसिकदृष्ट्या इतके तोडले गेले की त्याने धर्मांतर करावे, यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न करण्यात आले. या संपूर्ण प्रकरणामुळे आयटी क्षेत्रात मोठी खळबळ उडाली असून नाशिक पोलीस अधिक तपास करत आहेत.

## निदा खानच्या त्या कारनाम्याने अख्खा महाराष्ट्र हादरला

### आयटी कंपनीतील ती महिला कोण?



**निदा खानबाबत मोठा खुलासा :** गेल्या काही दिवसांपासून माध्यमांमध्ये निदा खान यांचा उल्लेख 'एचआर मॅनेजर' असा केला जात होता. मात्र, कंपनीने हे वृत्त चुकीचे असल्याचे या निवेदनामध्ये सांगितले आहे. निदा खान ही कंपनीत 'प्रोसेस असोसिएट' म्हणून कार्यरत होती, तिच्याकडे व्यवस्थापकीय किंवा नेतृत्वाचे कोणतेही पद नव्हते, असे कंपनीने स्पष्ट केले आहे.

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमधील एका नामांकित आयटी कंपनीत महिलांचा लैंगिक छळ आणि त्यांच्यावर धर्मांतरासाठी दबाव टाकण्यात आल्याच्या प्रकरणाने प्रचड खळबळ उडाली. गेल्या आठवड्याती ही केस उघडकीस आली आणि अख्खं राज्य हादरलं. या कंपनीत छळ होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर काही महिला पोलिस अधिकारी वेष बदलून तिथे गेल्या होत्या, आणि आरोपींचे गैरवर्तन, अश्लील वागणं समोरासमोर दिसल्यावर त्यांनी त्यांच्या मुसक्या आवळल्या.

या केसमध्ये आत्तापर्यंत अनेकांना अटक करण्यात आली असली तरी याप्रकरणात प्रमुख सहभाग असलेली आणि कंपनीची एचआर एक्झिक्युटिव्ह निदा खान ही मात्र अद्याप सापडलेली नाही. एफआयआरमध्ये नाव समोर आल्यापासूनच ती फरार आहे. एसआयटी तपासात तिच्या भूमिकेबद्दल गंभीर आरोप समोर आले आहेत. कंपनीतील पीडितांवर दबाव टाकणे, धर्मांतरासाठी सक्ती करणे आणि आरोपींच्या नेटवर्कला पाठिंबा देणे या आरोपांचा त्यात समावेश आहे.

पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, निदा खान ही केवळ एक कर्मचारीच नव्हती, तर कर्मचाऱ्यांना लक्ष्य करणाऱ्या आरोपी गटाची एक सक्रिय सदस्य होती. पोलिसांचा दावा आहे की, तिने केवळ आरोपी टीम लीडर्स पाठिंबाच दिला नाही, तर अनेक प्रकरणांमध्ये त्यांच्या कारवाया पुढे नेण्यातही तिने सक्रीय भूमिका बजावली.

**पीडितांवर टाकला दबाव**

आरोपांनुसार, निदा खान ही पीडितांच्या संपर्कात होती आणि इस्लामी चालीरीतींचे पालन करण्यासाठी त्यांच्यावर दबाव टाकत होती. अनेक पीडितांचा आरोप आहे की, निदा खान हिने त्यांना, नमाजासाठी, तसेच विशिष्ट कपडे घालण्यास आणि धार्मिक प्रथा अवलंबण्यासाठी भाग पाडलं.

एवढंच नव्हे तर पोलिसांच्या तपासात तिचे आणखीही काळे कारनामे उघडकीस आले आहेत. पीडित महिलांचा छळ होत असताना तिने आरोपी पुरुषांना पाठिंबा दिला. आरोपी टीम लीडर्स तिला 'डेअरडेव्हिलल' म्हणत, तर पीडिता महिला, तरूणी तिला प्रचंड घाबरायच्या. निदा खान हिने, पीडितांचा अपमान केल्याचा आणि त्यांच्यावर मानसिक दबाव आणल्याचाही आरोप आहे.

**व्हॉट्सॲप ग्रुपवर ठरवायचे टार्गेट**

पोलिसांच्या सांगण्यानुसार, एआर निदा खान ही आरोपींच्या या नेटवर्कमधील प्रमुख दुव्यांपैकी एक होती. तपासात असंही उघड झाले की, निदा खान एका अशा व्हॉट्सॲप ग्रुपची सदस्य होती, ज्या ग्रुपमध्ये आरोपी एकमेकांशी संवाद साधत असत. या ग्रुपमध्ये कर्मचाऱ्यांबद्दल चर्चा व्हायची, कोणाला कसं प्रभावित करायचं, पुढचं टार्गेट कोण असेल हे यावर ठरवलं जायचं. त्याच निदा खानचाही सक्रीय सहभाग होता.

## टीसीएस कंपनी मार्फत नाशिक प्रकरणाची सखोल चौकशी करणार

■ **नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमधील 'टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस'मधील बळजबरी धर्मांतर आणि अत्याचार प्रकरणामुळे सध्या आयटी क्षेत्रासह संपूर्ण देशात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून सोशल मीडियावर उलटसुलट चर्चा सुरू असतानाच, आता टीसीएस कंपनीने आपली अधिकृत भूमिका स्पष्ट केली आहे. या प्रकरणाच्या मुळाशी जाण्यासाठी कंपनीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील नामांकित संस्थांची नियुक्ती केली असून, सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत. यांसदभार्तील पोस्ट एक्स अकाऊंटवरुन शेअर करण्याता आली आहे.

**तपासासाठी टीम मैदानात :** टीसीएसचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ के. कृतिवासन यांनी या प्रकरणाची गांभीयार्ने दखल घेतल्याचे सांगितले. विशेष म्हणजे, या चौकशीत पारदर्शकता राहावी यासाठी 'डेलॉईट' आणि 'ट्रायलीगल' या कायद्याच्या दिग्गज संस्थांची मदत घेतली जाणार आहे. या अंतर्गत चौकशीचे नेतृत्व टीसीएसच्या अध्यक्षा आणि सीटीओ आरती सुब्रमण्यम करत आहेत. एवढच नाही तर केके मिस्त्री यांच्या अध्यक्षतेखाली एक विशेष कमिटी देखील स्थापन करण्यात आली आहे. ही कमिटी तपासाच्या प्रत्येक पैलूवर लक्ष ठेवणार असून आवश्यक ती पाऊले उचलणार आहे.

**मानसिक छळ, शिव्या आणि धर्मांतरासाठी दबाव**

मात्र आता या व्हॉट्सॲप ग्रुपमधील अनेक चॅट्स डिलीट करण्यात आले आहेत, पण ते पुन्हा मिळवण्याचा फॉरेन्सिक टीम प्रयत्न करत आहे. या केसमध्ये आत्तापर्यंत 12 पीडित समोर आल्या असून त्यांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे. आरोपींनी आपला छळ केला, ते शिव्या द्यायचे, त्यांना अयोग्यरित्या स्पर्श करायचे आणि त्यांच्या धार्मिक भावना दुखावायचे, असं अनेक पीडितांनी सांगितलंय. एवढंच नव्हे तर त्या पीडितांवर धर्मांतर करण्यासाठी दबाव आणला जायचा. या संपूर्ण प्रकरणात निदा खानाही सहभाग होता, ती भरती प्रक्रियेद्वारे विशिष्ट पद्धतीने लोकांची भरती करत होती का, याचीही तपासणी केली जात आहे. पोलिसांनी तिच्या कारवायांसंबंधीच्या नोंदी मिळवण्यासाठी कंपनीच्या व्यवस्थापनाला पत्र लिहिलं आहे. एका स्थानिक व्यक्तीच्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी कंपनीच्या आवारात गुप्तपणे महिला कॉन्स्टेबल तैनात केल्यावर हे संपूर्ण प्रकरण उघडकीस आले. हाऊसकीपिंग कर्मचारी असल्याचे भासवून, त्यांनी आतील हालचालींवर लक्ष ठेवले आणि तपासाला दिशा देणारी महत्त्वपूर्ण माहिती गोळा केली. तपासादरम्यान इम्रान नावाचा एक संशयितही समोर आला आहे, ज्याला आरोपींपैकी एकाने मलेशियातील आपला संपर्क म्हणून ओळखलं आहे. हँ३२अस्त्रस्त्र चॅट्सच्या आधारे त्याच्या भूमिकेचाही तपास केला जात आहे. या प्रकरणाची सूत्रधार निदा खान हिला पकडण्यावर आणि तिचे नेटवर्क समजून घेण्यावर एसआयटीचे लक्ष केंद्रित आहे.

## पुण्यात अंगावर शहारे आणणारा अघोरी प्रकार!

### भूत आणि करणीच्या नावाखाली थेट...

■ **पुणे। प्रतिनिधी,**

गेल्या काही दिवसांपासून राज्याच अघोरी कृत्य करत असलेल्या भोंदूबाबांना अटक करण्यात आली आहे. नाशिकमधील लिंगपिसाट अशोक खरात प्रकरण समोर येताच राज्यात खळबळ माजली. त्यानंतर ठिकठिकाणी भोंदूबाबांविरोधात ॲक्शन घेण्यात आली. आता असाच एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. 'जागरण'च्या निमित्ताने घरात 'चेडा' (भूत) आणला आहे, तो कुटुंबाचा भाग बनवायचा आहे अशा भयानक आणि प्रक्षोभक विधानांनी एका कुटुंबाला मानसिक त्रास देणाऱ्या दोन भोंदू भगतांचा कट उघडकीस आला आहे. ही घटना खेड तालुक्यातील मंदोशी आणि राजपूर येथे घडली असून, तिने संपूर्ण परिसरात खळबळ उडवून दिली आहे. किसन तळपे आणि मंगेश कारोटे या दोन कथित भगतांवर पुराव्यासह पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. ऑडिओ रेकॉर्डिंग आणि उपलब्ध पुराव्यांनुसार, या दोघांनी संगनमताने एका कुटुंबात फूट पाडण्याचा आणि त्यांना मानसिक गुलाम बनवण्याचा अघोरी प्रयत्न केला.

**दोघांचे संगनमत**

किसन तळपे (मंदोशी) आणि मंगेश कारोटे (राजपूर) या दोघांनी एकमेकांकडे बोट दाखवत आणि 'उजवा-डावा प्रसाद', 'तांबड्या अंगाऱ्याचे' नाटक करून दैवी शक्तीचा खोटा देखावा निर्माण केला. यामुळे पीडित व्यक्तीचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला गेला.

**कायदेशीर कारवाईची मागणी**

या प्रकारामुळे पीडित कुटुंब प्रचंड मानसिक तणाव आणि दहशतीखाली आहे. त्यांनी प्रशासनाकडे, महाराष्ट्र अनिष्ट प्रथा व जादूटोणा विरोधी कायदा २०१३ अंतर्गत दोघांवर गुन्हा दाखल करावा, महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार प्रतिबंधक कायदा २०१७ अंतर्गत कारवाई करावी, सोशल मीडियावर ऑडिओ क्लिप व्हायरल केल्याप्रकरणी सायबर गुन्ह्यांतर्गत तपास करावा आणि या दोघांना कोणी भाग पाडले किंवा त्यांचा 'बोलावता धनी' कोण आहे, याची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी केली आहे.

**परिसरात खळबळ**

ही घटना उघडकीस आल्यानंतर खेड तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे. स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी अशा भोंदू भगतांपासून सावध राहण्याचे आवाहन केले आहे. लोकांना सांगण्यात आले आहे की, भूत, करणी, थडगे किंवा अघोरी विधींच्या नावाखाली पैसे किंवा विश्वास घेणाऱ्या व्यक्तींना लगेच पोलिसांकडे किंवा प्रशासनाकडे तक्रार करावी.

**धक्कादायक दावे आणि भीतीदायक विधाने**

तक्रारीनुसार, जागरणासाठी बोलावणी करणाऱ्या व्यक्तीच्या घरासमोर थडगे असल्याचे सांगून भगतांनी भीती घातली. त्यांनी दावा केला की, "घरात बाहेरचा 'चेडा' आणून ठेवला आहे. त्याला कुटुंबाचा भाग बनवण्यासाठी विशेष विधी करावे लागतील." जागरणाच्या बहाण्याने त्यांनी संपूर्ण भावकी (कुटुंबीय) कडून तांदूळ गोळा केले आणि त्याचा नैवेद्य दाखवून आणलेल्या भुताला प्रसन्न करण्याचा नाटक केले. याशिवाय त्यांनी "एकाची पोळी भाजली जाईल, तर बाकीच्यांची करपून जाईल" असे भयावह वाक्य उच्चारले. तसेच, ह्लपोरांना पुढे केले आणि चोरांना मागे ठेवलेह्व अशा अपमानजनक शब्दांत कुटुंबातील सदस्यांचा अपमानही केला. या संभाषणाचे ऑडिओ रेकॉर्डिंग सोशल मीडियावर व्हायरल झाल्याने पीडित कुटुंबाची मोठी बदनामी झाली.

## काळी बाहुली-लिंबू आणि सुया, सरपंचपदाच्या पोट निवडणूकीत भानामतीच्या प्रकाराने दहशत

■ **सांगली। प्रतिनिधी,**

गावपातळीवरील सरपंच पदाच्या पोटनिवडणूकीदरम्यान भानामतीचा प्रकार घडल्याने गावातील लोक घाबरले आहेत. सरपंच पदाच्या उमेदवाराच्या शेताशेजारील जागेत फोटोवर हळद कुंकू, काळ्या बाहुल्या आणि लिंबांना सुया टोचून काळे कापड टाकून भानामती केल्याचा धक्कादायक प्रकार सांगलीच्या मिरज तालुक्यातील वड्डी गावात घडला आहे. या प्रकारामुळे वड्डी गावात दहशतीचे वातावरण असून गावकरी भयभयीत झाले आहेत.

निवडणुका चालू झाल्या की निवडणुकीच्या प्रचाराबरोबर उमेदवारावर काळी जादू आणि भानामतीचे प्रकार देखील अनेक ठिकाणी घडत असतात. प्रतिस्पर्धी उमेदवारावर मात करण्यासाठी करण्यासाठी करणी करणे,जादूटोणा करणे अशा गोष्टींचा वापर करण्याचे प्रकार आता वाढू लागला आहे. अशाच पद्धतीचा एक भानामतीचा प्रकार सध्या सांगलीच्या मिरज तालुक्यातल्या वड्डी गावामध्ये समोर आला आहे.

मिरज तालुक्यातल्या वड्डी ग्रामपंचायतच्या सरपंच पदाची पोटनिवडणूक सध्या सुरु आहे. या पोटनिवडणुकीमध्ये जन सुराज्य शक्ती पक्षाकडून राजू वजीर हे निवडणूक लढवत आहेत. प्रचाराचा अंतिम टप्पा सध्या पार पडत आहे. वेगवेगळ्या पातळीवर सत्ताधारी आणि विरोधकांकडून प्रचाराचा धडाका उडवून देण्यात येत असताना गावात करणीचा आणि भानामतीचा विचित्र प्रकार समोर आल्याने एकच खळबळ उडाली आहे. सरपंच पदाचे उमेदवार असणारे राजू वजीर यांचा फोटो वापरून विरोधकांनी करणी भानामती केल्याचे उघडीकीस आले आहे. वजीर यांच्या फोटोवर काळी बाहुली कापड, केळी, लिंबू हळद-कुंकू, लिंबाला सुया टोचणे असा प्रकार घडला आहे.

**भानामतीचे साहित्य जाळले**

या घटनेनंतर उमेदवार वजीर यांच्या समर्थकांनी हा प्रकार पाहताच येथील भानामतीचे सर्व साहित्य पेट्रोलने जाळून टाकले असल्याचे माजी उपसरपंच कल्लपा नाईक यांनी म्हटले आहे. तसेच या घटनेचा निषेध नोंदवला आहे. वजीर यांचा विजय निश्चित असल्याने विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरल्याने अशा पद्धतीचे कृत्य करण्यात आल्याचे वजीर यांच्या समर्थकांनी म्हटले आहे.



**केवळ अंधश्रद्धा आहे - अंनिस**

भानामती सारखे केले जाणारे प्रकार हे केवळ अंधश्रद्धा असून त्यामुळे समोरच्यावर भीती निर्माण करण्याचा प्रकार आहे. अंधश्रद्धा निर्मूलन जादूटोणा कायद्यांतर्गत व आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला पाहिजे. अशा कोणत्याही भानामतीच्या प्रकाराला घाबरून जाऊ नये,असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे सांगली अध्यक्ष राहुल थोरात यांनी केले आहे.



संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# आजची देशासमोरची खरी अडचण हीच...

**महिला आरक्षण आणि जात आरक्षण या दोन्हींचंही प्रतिबिंब २०३४ च्या निवडणुकीत दिसेल. महिलांच्या आरक्षणाला तोपर्यंत तिष्ठत ठेवण्याऐवजी मतदारसंघांत सरसकट ५० टक्के वाढ करून महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यावं आणि मतदारसंघही थोड्या तरी कमी लोकसंख्येचे करावेत, असा सरकारचा प्रयत्न होता. तो आता मागे पडला आहे.**

वरिष्ठ कायदेमंडळात महिलांचे ३३ टक्के प्रतिनिधित्व राखीव ठेवण्यासाठी मांडलेल्या विधेयकाला काल लोकसभेत बहुमत मिळालं, पण घटनादुरुस्ती विधेयकासाठी आवश्यक दोन तृतीयांश बहुमत मिळवण्यात कमी पडल्याने ते पुन्हा एकदा बारगळलं. महिलांना राज्याच्या आणि देशाच्या कायदेमंडळात ३३ टक्के आरक्षण देऊ करणारं पहिलं विधेयक गेल्या शतकात एच. डी. देवेगौडा पंतप्रधान असताना मांडलं गेलं. त्यानंतरही तसे प्रयत्न झाले. पण, त्यात नेहमीच काही ना काही तांत्रिक कारणं काढून खोडा घातला गेला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारने २०२३ मध्ये मांडलेल्या 'नारीशक्ती वंदन अधिनियम २०२३' या विधेयकाला मात्र एकमताने मंजुरी मिळाली होती. त्या विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी यावेळी ही एकत्रित विधेयकं मांडली जाणार होती. त्यासाठी सरकारने हे विशेष अधिवेशन बोलावलं होतं. सरकारने महिला आरक्षण संविधान दुरुस्ती विधेयक आणि मतदार संघ फेररचना, तसंच केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) ही दोन साधी विधेयकं परस्परांशी सांगड घालून मांडल्याने विरोधकांचा सरकारच्या या पावलाला विरोध होता. महिलांच्या आरक्षणासंदर्भातील विधेयकाला आमचा विरोध नाही; पण त्याआडून सरकार अन्य दोन विधेयकं मांडत आहे. ती मंजूर झाली, तर देशात उत्तर आणि दक्षिण अशी दुफळी तयार होईल. प्रगत राज्यांचा त्यात तोटा होईल. विकसित, अर्ध विकसित किंवा विकासोन्मुख राज्यांच्या प्रतिनिधींच्या संख्येत वाढ झाली, तर त्यांचं राज्य विकसित, प्रगत राज्यांवर अधिक घट्ट होईल, अशी भीती विरोधकांकडून मांडली जात होती. महाराष्ट्र नेहमीच राष्ट्रीय धोरणांसोबत राहात असल्याने मोदी सरकारच्या या विधेयकांना महाराष्ट्रातून पक्षीय धोरणातून विरोध झाला; पण राज्य म्हणून कुठेही विरोधाचा सूर उमटला नाही. दक्षिणेत मात्र पक्षांच्या सीमा ओलांडून राज्य म्हणून आक्षेप नोंदवले गेले. जनगणनेच्या आधारावर होणाऱ्या मतदार संघांच्या परिसीमनात आपल्यावर अन्याय होऊ नये, भविष्यात आपला राजकीय तोटा होऊ नये, यासाठी दक्षिणेतल्या राष्ट्रीय लोकशाही आघाडीत असलेल्या मुख्यमंत्र्यांनीही गेलं वर्षभर कुरकुर चालवली होती. चंद्राबाबू नायडू यांनी तर अधिक अपत्य असल्यास विशेष सवलती जाहीर केल्या आहेत. दक्षिणेतील पक्ष आणि नेत्यांचा लोकसंख्येवर आधारित परिसीमनाला, जातगणना न झालेल्या २०११ च्या जनगणनेचा आधार घेण्याला विरोध होता; तर उत्तरेकडील पक्ष, नेत्यांनी २०२६ च्या जातगणनेनंतर महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक आणल्यास मागास, अतिमागास, आदिवासी महिलांना अधिक न्याय मिळेल, असा मुद्दा पुढे केला होता. समाजवादी पार्टीने नेहमीप्रमाणे अल्पसंख्याक; म्हणजे मुस्लीम महिलांचा आरक्षण विधेयकात स्वतंत्र विचार व्हावा, अशी भूमिका मांडली होती. पण, त्याला काही अर्थ नव्हता. कारण, धर्माच्या आधारे आरक्षणाची तरतूद घटनेत नाही, हे त्यांनाही माहीत आहे. आपला मतदार डोळ्यांपुढे ठेऊन केलेली ही मागणी निरर्थक होतीच; पण त्याहीपेक्षा समाजमनात नको ते विष कालवणारी, निषेधार्ह होती. महिला आरक्षणासाठी घटनेत १३१ वी दुरुस्ती सुचवणारं विधेयक दोन तृतीयांश संख्याबळाअभावी पराभूत झाल्यानंतर सरकारने मतदारसंघ फेररचना आणि केंद्रशासित प्रदेश कायदे (दुरुस्ती) विधेयकं मागे घेतली. ती मताला टाकलीच नाहीत. साध्या बहुमताने ती सहज मंजूर झाली असती; पण ती स्वतंत्रपणे मंजूर होण्याला काही अर्थ नव्हता. त्यातून आणखी वादाचे मुद्दे पुढे आले असते. महिलांना ३३ टक्के आरक्षण दिल्यास पुरुष लोकप्रतिनिधींच्या तेवढ्या जागा कमी झाल्या असत्या. या प्रक्रियेत आपल्या जागा जातील, अशी भीती बऱ्याच दिग्गजांना, पुरुषी मानसिकतेच्या राजकीय वर्तुळाला आहे, हे ओळखून त्यांची भीती घालवण्यासाठी सध्याच्या लोकसभेच्या ५४३ जागांत ५० टक्के भर घालून महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित ठेवण्याची शक्कल सरकारने लढवली होती. पण, विरोधकांचा त्यालाही विरोध होता. वास्तविक मुद्द्यांवर विरोध करता येत नाही हे स्पष्ट असल्याने विरोधकांनी सरकारच्या हेतूवर शंका घेऊन नेहमीप्रमाणे काल्पनिक विरोध सुरू केला होता. सरकारच्यावतीने प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशात जागांमध्ये कशी वाढ होईल, याचा तपशील आकडेवारीसह दिला गेला होता. पण या ५० टक्के वाढीचा उल्लेख विधेयकाच्या प्रस्तावात स्पष्टपणे नाही, म्हणजे यामागे सरकारची काहीतरी चाल आहे, असा संशय व्यक्त करून विरोधकांनी आपला विरोध कायम ठेवला. लोकसभेतील चर्चेदरम्यान गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसचे नेते वेणुगोपाल यांना 'मी आत्ताच्या आत्ता सरसकट ५० टक्क्यांचा स्पष्ट उल्लेख प्रस्तावात करतो. तुम्ही सर्व विधेयकं मंजूर करण्याची हमी द्या', असं आव्हान दिलं, तेव्हा विरोधी बाकांवर भीषण शांतता पसरली होती. काळंबेरं सरकारच्या नाही, विरोधकांच्याच मनात आहे, हे त्यावेळी स्पष्ट झालं! २०११ नंतर देशाच्या लोकसंख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणावर झालं आहे. त्यामुळे, मतदारसंघांचा तोल पूर्णपणे ढळला आहे. मतदारसंघांतील लोकसंख्येत फार मोठी तफावत असू नये, असं घटनेत नमूद आहे. तरीही १९७१ च्या जनगणनेच्या आधारावरील मतदारसंघांतच आज निवडणुका होत आहेत. महिला आरक्षणाच्या निमित्ताने त्यातही तात्पुरती दुरुस्ती होईल, २०१९ च्या निवडणुका त्या आधारे घेता येतील; त्यानंतरच्या निवडणुका आता सुरू झालेल्या जनगणनेच्या आधारावर घेता येतील. या जनगणनेत जातगणनाही होणार असल्याने २०३४ च्या निवडणुकात या जातगणनेवर आधारित राखीव मतदारसंघ ठरतील. महिला आरक्षण आणि जात आरक्षण या दोन्हींचंही प्रतिबिंब २०३४ च्या निवडणुकीत दिसेल. महिलांच्या आरक्षणाला तोपर्यंत तिष्ठत ठेवण्याऐवजी मतदारसंघांत सरसकट ५० टक्के वाढ करून महिलांना ३३ टक्के आरक्षण द्यावं आणि मतदारसंघही थोड्या तरी कमी लोकसंख्येचे करावेत, असा सरकारचा प्रयत्न होता. तो आता मागे पडला आहे. ही विधेयकं आणण्यामागे राजकारण होतं, असा आरोप विरोधी पक्ष करत आहेत. राजकीय व्यवस्थेत राजकारणच करायचं असतं, हे विरोधी पक्षांना कळत नाही आणि जमतही नाही हीच आजची देशासमोरची खरी अडचण आहे.

# भगवान परशुरामाच्या दिव्य जीवनाची अद्भुत गाथा!



## १. भगवान परशुरामाने केलेला दैत्यसंहार!

१ अ. **शिवाने परशुरामाला परशूच्या साहाय्याने दैत्याच्या पराभवाचे दायित्व देणे :** 'परशुरामाला श्री शंकराकडून अस्त्रप्राप्ती झाली होती. त्या कथेनुसार देव-दानवांचे युद्ध झाले. त्यात दानवांनी देवांचा पराभव केला. इंद्रासहित सर्व देव चिंताग्रस्त झाले होते. त्यांना साल्व दैत्याचा प्रचंड त्रास झाला होता. सर्वांनी शिवाला प्रार्थना केली, ''कोणत्याही रितीने या दैत्याचा पराभव व्हावा आणि सर्व देवादिकांना भयमुक्त होता यावे.'' शंकराने परशुरामाला सांगितले, ''साल्वाचा पाडाव करण्याचे कार्य तू हाती घे. हे दायित्व तू समर्थपणे पेलशील, अशी मला निश्चिती आहे.'' त्यावर परशुरामाने हात जोडून सांगितले, ''हे भगवान, जर त्या साल्वापुढे प्रत्यक्ष इंद्राची धडकत (धाडस) लागली नाही, तर मी एकटा काय करणार? प्रभावी शस्त्रांविना मी दैत्यांचा नाश कसा करणार?'' यावर शंकराने शैवास्त्रमय तेज परशुरामाला देत सांगितले, ''मी तुला पूर्वीच दिलेल्या अस्त्रांनी म्हणजे परशूने तू शत्रूशी युद्ध करावे, म्हणजे हे युद्धकौशल्य कसे प्राप्त झाले, ते तुज्याच लक्षात येईल.''

१ आ. **शिवाने मानवरूपधारी विष्णूला पाडाव करण्यासाठी पाठवल्याचे समजताच साल्व दैत्याने त्यांनाच जिंकून घेण्याचा निश्चय करणे :** परशुराम साल्वाचा नाश करण्याच्या कामगिरीवर निघताच सर्वत्र उत्पात होऊ लागला. साल्व चिंतामग्न झाला. तो शुक्राचार्यांकडे गेला. त्यांना म्हणाला, ''हे काय चालले आहे? जर ब्रह्मदेवाची आराधना करून माज्यासाठी अवध्य (अमर) असण्याचा वर मिळाला आहे, तर मग असे का होत आहे?'' त्यावर शुक्राचार्य म्हणाले, ''मातेमुळे ब्रह्माकडून मिळालेल्या वरदानाने, तसेच संजीवनी विद्येने असुरांना जय मिळाला, हे खरेच आहे; परंतु तुज्या नाशासाठी शिवाने मानवरूपधारी विष्णूला पाठवले आहे. तेव्हा त्यांच्या समवेत युद्ध करण्यापेक्षा इंद्राशी संधी करणे हेच तुझ्यासाठी श्रेयस्कर आहे.'' त्यावर 'एका मानवाला घाबरून आम्ही राज्यत्याग करणार नाही. परशुरामाला आमच्याशी युद्ध करायला पाठवले, त्या शिवांनाच आम्ही जिंकू', असे साल्व म्हणाला.

१ इ. **युद्ध न करण्याविषयी अन्यांनी दिलेले उपदेश साल्व दैत्याने अव्हेरले ! :** शुक्राचार्य म्हणाले, ह्यह्यआजपर्यंत देवकायार्साठी विष्णूंनी अनेक वेळा अवतार घेतले आहेत आणि असुरांचा नाशही केला आहे. तू आता इंद्राशी संधी घडवणे हेच योग्य आहे. त्यामुळे तुमचा सर्वनाश टळेल.'' तथापि हा उपदेश साल्वाला पटला नाही. त्याने युद्ध करायचे ठरवले. महाविष्णूंनी अवतार घेऊन पूर्वी अनेक दैत्यांचा नाश केला होता, हे त्याला ठाऊक होते, तरीसुद्धा त्याने हे युद्ध करायचे ठरवले. त्याची धारणा होती की, जर विष्णूंकडून युद्धात मरण आले, तर ते पत्करू. विशिष्ट व्यक्तीकडून मरण येणे हे इष्ट असते. त्यामुळे ज्यांनी त्याला उपदेश केला, तो त्याने अव्हेरला. अशा वेळी त्याचा धाकटा भाऊ राहू त्याला म्हणाला, ''ज्यांच्या क्रोधामुळे आपण अंगहीन झालो आणि ज्यांच्या कृपेमुळे आपल्याला ग्रहत्व प्राप्त झाले, त्या विष्णूशी वैर करणे मला योग्य वाटत नाही.'' 'विष्णूकडून मरण आल्यास उत्तम गती प्राप्त होईल आणि स्वर्गलोकी आपली भावाभावांची भेट होईल', असे सांगून साल्वाने त्याचे तोंड बंद केले.

१ ई. **शिवासह परशुरामाचाही युद्धात नाश करणार असल्याचे दैत्याने सांगणे :** परशुरामाने त्याचा दूत म्हणून अकृतव्रणाला साल्वाकडे पाठवले आणि निरोप दिला की, शिवाने मला तुज्याशी युद्ध करायला सांगितले असल्यामुळे तू सिद्धता कर. इंद्राला युद्धात जिंकून देवादिकांना जो त्रास दिला आहेस, त्याचे फळ भोगण्यासाठी सिद्ध हो. यावर 'परशुरामाची या कामी ज्या शिवाने नियुक्ती केली आहे, त्या शिवालाच मी रणात जिंकेन. माज्यासमवेत जर परशुरामाला युद्ध करायचे असेल, तर त्याचाही मी युद्धात नाश करीन', एवढेच उत्तर देऊन साल्व थांबला नाही, तर त्याने युद्धाची सिद्धता चालू केली.

१ उ. **...आणि परशुरामाने परशू फेकून साल्व दैत्याचे मस्तक उडवले! :** चतुरंग सेनेच्या समवेत तो रणात उतरला. साल्वानेच युद्धाला तोंड फोडले. त्याने त्याची विविध अस्त्रे परशुरामावर फेकली; पण परशुराम स्थिर उभा होता. अंगावर चालून आलेल्या सैनिकांची त्याने हत्या केली. साल्वाने परशुरामावर हत्ती सोडला. केवळ हुंकाराच्या साहाय्याने परशुरामाने हत्तीच्या वेगावर बंधन आणले. परशुरामाने परशू साल्वावर फेकला आणि त्याचे मस्तक उडवले. साल्व रणात पडलेला बघून उरलेले सर्व दैत्य समुद्राकडे निघून गेले. अशा प्रकारे इंद्राला त्याचे गेलेले राज्य परत मिळाले.

## २. शंकराने प्रसन्न होऊन परशुरामाला दिलेले त्याचे संपूर्ण अस्त्रग्राम !

भगवान आशुतोषांनी (शिवाने) घेतलेल्या परीक्षेत परशुराम उत्तीर्ण झाला. त्यामुळे शिव प्रसन्न होऊन त्याला म्हणाला, ''मी माझे पूर्ण अस्त्रग्राम (अस्त्रांचा खजिना) तुला देतो. त्याचा स्वीकार कर.'' परशुरामासमोर जणू अस्त्रांचा खजिना साक्षात प्रगटला होता. त्या अस्त्रांची नावे पुढीलप्रमाणे आहेत. ब्रह्मास्त्र, वैष्णव, रौद्र, आग्नेय, वासव, नैऋत, याम्य, कौबेर, वारुण, वायव्य, सौम्य, सौर, पार्वत, चक्र, वज्र, पाश, सर्प, गांधर्व, स्वापन, भौत, पाशुपत, ऐशिक, तर्जन, प्रास, भारुड, नर्तन, अस्त्ररोधन, आदित्य, रैवत, मानव, अक्षिसंतर्जन, भीम, ज्रुम्भण, रोधन, पर्जन्य, राक्षस, मोहन, कालास्त्र, दानवास्त्र, ब्रह्मशिरस अशी सर्व अस्त्रे समंत्रक, सप्रयोग आणि संहार शक्तींनी युक्त अशी परशुरामाला मिळाली. दिव्य धनुष्य, अक्षय भाता, तीक्ष्ण बाण, अभेद्यकवच आणि मंत्रप्रभाव आदी अनेक वर शिवाने त्याला दिले.

## ३. शिवाने विराटपुरुष महानारायणांचे ध्यान करत असल्याचे परशुरामाला सांगणे

एक दिवस शिवाला ध्यानावस्थेत पाहिल्यावर परशुरामाने विचारले, ''हे प्रभो, सर्व देव आणि ऋषि तुमचे पूजन करतात, मग तुम्ही कुणाचे ध्यान करता?'' या पृच्छेवर शिव म्हणाला, ''बाळा, मी विराटपुरुष असलेल्या महानारायणांचे सतत ध्यान करतो.''

## ४. परशुरामाने अधर्मी क्षत्रियांच्या नाशाची प्रतिज्ञा सांगितल्यावर ब्रह्मदेवाने शिवाची अनुज्ञा घेण्यास सांगणे

जमदग्नीऋषींचा वध झाल्यानंतर रेणुकामातेने सहगमन केले. त्यानंतर त्यांची अंत्येष्टी पूर्ण करून निघालेला परशुराम ब्रह्मदेवाच्या दर्शनासाठी गेला. ब्रह्मदेवाने त्याचे कुशल विचारून आशीर्वाद दिला. ब्रह्मदेवाने सांगितले, ''हे वत्सा, कशासाठी येथे आला आहेस?'' त्यावर परशुरामाने आदरपूर्वक अभिवादन करून सर्व वृत्तांत सांगितला. अधर्मी क्षत्रियांच्या नाशाची प्रतिज्ञासुद्धा सांगितली. ते ऐकल्यावर ब्रह्मदेव म्हणाले, ह्यह्यक्रोधाच्या भरात तू भयंकर प्रतिज्ञा केली आहेस. परमात्म्याच्या इच्छेने सृष्टी निर्माण झाली आहे. त्याच्याच इच्छेने ती चालते. त्यात ढवळाढवळ करू नये; परंतु अधर्मी असलेल्यांना धडा शिकवायला हवा. शिवाकडून अनेकांना अत्यंत भयंकर शक्ती प्राप्त झालेली आहे. अशा असंख्य विरांचा नाश करायचा असेल, तर त्यांचीच अनुज्ञा घेणे योग्य ठरेल. तू त्यांच्याकडे जा. त्यांनी जर कृष्णमंत्र आणि त्रैलोक्यविजयकवच देण्याची कृपा तुज्यावर केली, तर तुला प्रतिज्ञा पूर्ण करता येईल. त्यांच्या मनात आले, तर ते प्रत्यक्ष 'पाशूपतास्त्र' देतील.''

## ५. युद्धात रक्षण होण्यासाठी शंकराने परशुरामाला ह्यत्रैलोक्य विजयह्न कवच देणे

ब्रह्मदेवाच्या आज्ञेनुसार परशुराम शिवलोकी गेला. त्याने शिवाला वंदन करून आपला उद्देश सांगितला. शिवाने प्रिय शिष्याची विनंती ऐकून थोडा विचार करत शेजारी असलेल्या भगवतीमाता भवानीकडे पाहिले. त्या म्हणाल्या, ''हे परशुरामा, पृथ्वीवरील पराक्रमी; परंतु अधर्मी क्षत्रियांचा निःपात करण्याची प्रतिज्ञा तू घेतली आहेस खरी; परंतु भगवान आशुतोषाने कृपा केल्यासच ते शक्य आहे.'' शंकराने परशुरामाला प्रतिज्ञापूर्तीसाठी श्रीकृष्णमंत्राचे अनुष्ठान करायला सांगितले. युद्धात रक्षण होण्यासाठी 'त्रैलोक्यविजय' कवच दिले. शिव, माता भवानी, कार्तिकेय आणि गणेश यांना नमस्कार करून परशुरामाने शिव-पार्वतीला प्रदक्षिणा घातली.

## ६. परशुरामाच्या दिव्यत्वाची प्रचीती दर्शवणारी घटना !

६ अ. **परशुरामाला भयग्रस्त हरणाचे जोडपे दिसणे :** परशुराम मंत्रसिद्धीसाठी पुष्कर तीर्थावर जायला निघाला. तिथे येताच त्याने साधनेला प्रारंभ केला. परशुराम तपस्येला बसलेला असतांना त्याचा दूत अकृतव्रण समिधा, फुले आणि कंदमुळे आणायला वनात जात असे. एकदा परशुराम मध्यम पुष्कर येथे स्नानासाठी गेल्यावर चमत्कारिक घटना पाहिली. हरणाचे एक जोडपे भयग्रस्त होऊन जलाशयाचे पाणी पीत होते. तेथे एक व्याध (शिकारी) पोचला. त्याने आडोशाला जाऊन धनुष्य सज्ज केले. तेवढ्यात त्याला पलीकडच्या तीरावरील परशुराम आणि अकृतव्रण दिसले. प्रत्यक्ष सहस्राजुर्नाचा नाश करणारा परशुराम समोर असतांना 'त्या मृगांना आपण कसे मारणार?', या विचाराने तो खांद्यावर धनुष्य चढवून तसाच उभा राहिला. मृगांनी परशुरामाला पाहिले. परशुरामाच्या मनात विचार आला की, येथे वाघाची गर्जना ऐकू येत नाही किंवा व्याधही दिसत नाही. मग यांना कसली भीती ? तेवढ्यात पाणी संपवून हरणाचे जोडपे इकडे-तिकडे पहात होते.

६ आ. **परशुरामाच्या कृपेमुळे हरिणाला लाभलेली दिव्य दृष्टी! :** परशुरामही अकृतव्रणासह तेथेच थांबला. हरिणी हरिणाला म्हणाली, ''परशुरामासारखा वीर असतांना आपल्याला भीती कशाची? एखाद्या व्याधाने जर आपल्यावर प्रहार करायचे ठरवले, तर निरपराध्यांवर प्रहार करणारा तो व्याधच नष्ट होऊन जाईल. जोपर्यंत भार्गवराम इथे आहेत, तोपर्यंत आपणही येथेच थांबूया.'' त्यावर मृग म्हणाला, ''मलापण परशुरामाचा पराक्रम ठाऊक आहे. त्याच्या शेजारी जो अकृतव्रण आहे, त्यालाही पूर्वी परशुरामाने वाघापासून वाचवले होते. पित्याच्या वधानंतर त्याने अधर्मी क्षत्रियांच्या नाशाची घोर प्रतिज्ञा केली आहे. तिच्या पूर्ततेसाठी परशुराम नुकताच ब्रह्मलोकी गेला होता. ब्रह्माने त्याला शिवाकडे पाठवले आणि शिवाने कृपावंत होऊन श्रीकृष्ण मंत्र अन् विजयकवच दिले. त्याच्या सिद्धीसाठी परशुराम या तीर्थावर आला आहे; परंतु त्याची मंत्रसिद्धी अद्याप झाली नसावी.'' हरिणीने आश्चर्याने विचारले, ''तुला हे सर्व कसे ठाऊक?'' हरीण म्हणाले, ''परशुरामाच्या दर्शनाने आपण पावन झालो आहोत. केवळ त्याच्याच कृपेमुळे हे सगळे ज्ञान मला झाले. तिन्ही लोकांतील प्राणिमात्रांचे शुभाशुभ मी जाणू शकतो. परशुराम जे कार्य पुढे करणार आहे, तेसुद्धा मला दिसत आहे. त्याच्या भक्तीसाधनेमुळे त्याचा मंत्र सिद्ध होईल आणि त्यातूनच त्याची प्रतिज्ञाही सफल होणार आहे.'' मंत्रसिद्धीसाठी पुष्कर तीर्थावर साधना चालू असतांना भार्गवरामाच्या केवळ दर्शनाने हरणाचे जोडपे पुनीत झाले आणि मृगाला दिव्यज्ञान अन् दिव्यदृष्टी प्राप्त झाली, यावरून परशुरामाचा दिव्य प्रभाव लक्षात येतो. त्याच्या चिरंजीव कायार्ची कथा समोर येते.

## ७. परशू शस्त्राची महती!

परशू हे पाणीमुक्त शस्त्र असल्याचे म्हटले जाते. मंत्रसामर्थ्याने ते दूरवर फेकता येते आणि काम करून झाल्यानंतर ते फेकणाऱ्याच्या हातात परत येते. परशू फेकण्याच्या पद्धतीला 'हात'म्हणतात. हे 'हात' सहा प्रकारचे सांगितले आहेत. कराल, अवघात, दंशोपप्लुत, क्षिप्त, हस्तव आणि शून्य हे ते ६ प्रकार होय. धनुर्वेदावरील ग्रंथात परशूविषयी काही शास्त्रीय माहिती मिळते.

## ८. परशुरामाला शस्त्रे धारण करण्याची शक्ती प्राप्त झाली नसल्याने शिवाने पृथ्वी प्रदक्षिणा करण्यास सांगणे

एकीकडे वेदाध्ययन आणि दुसरीकडे शस्त्रास्त्र शिक्षण चालू असतांना जमदग्नींनी केवळ परशुरामालाच 'परशू' हे शस्त्र दिले. परशुराम जेव्हा तपश्चर्या आणि शस्त्रविद्येतील रहस्ये ठाऊक व्हावीत, यांसाठी कैलासावर जाऊन 'शिव आराधना' करू लागला, तेव्हा प्रसन्न होऊन शंकराने त्याला सांगितले, ''हे वत्सा, शस्त्रे धारण करण्याची शक्ती अद्याप तुझ्यात आलेली नाही. तू अद्यापही तुझी तपश्चर्या चालू ठेव. त्यानंतर सर्व पृथ्वीची एक प्रदक्षिणा करून सर्व तीर्थावर जाऊन स्नान करून पवित्र देह प्राप्त करून घे आणि मग माझ्याकडे ये.''

## ९. परशुरामाने ह्यशिल्पशास्त्राह्नच्या साहाय्याने हिमालयाची दरी फोडून ब्रह्मपुत्रेचा प्रवाह वळवला

तपस्या संपवून तो पृथ्वी प्रदक्षिणेसह तीर्थांना भेट द्यायला निघाला. आग्नेय दिशेकडील ब्रह्मकुंडावर त्याने स्नान केले. तेव्हा ब्रह्मपुत्र नदी हिमनगांनी अडवली असल्याचे त्याला दिसले. 'तेथे साठलेले पवित्र जल भूसपाटीवर न्यावे', असे त्याला वाटले; म्हणून त्याने हिमालयाची दरी फोडून ब्रह्मपुत्रेचा पूर्वेकडील प्रवाह पालटून दक्षिणेकडे वळवला. अर्थात् भार्गव कुळासाठी तसे करणे कठीण नव्हते. या कुळाने 'शिल्पशास्त्र' प्रवर्तित केले होते. किंबहुना शिल्पशास्त्र हे त्यांच्या कुळामध्ये एक महत्त्वाचे शास्त्र म्हणून जोपासले जात होते. पश्चिम किनाऱ्यावर आल्यावर परशुरामाने प्रभासक्षेत्री तपश्चर्या केली. त्या भूमीवर महादेवांचे दिव्य लिंग स्थापन केले. त्यामुळे शंकराने प्रसन्न होऊन त्या लिंगात नेहमीच वास करण्याचे आश्वासन दिले.

## १०. शिवाने परशुरामाला चारही दिशांना जाण्यास सांगितल्यामागील कारण

ज्या पुण्यपावन क्षेत्री परशुराम गेला, तेथे त्याला ऋषिमुनींचे दर्शन झाले. वेदमंत्रांचा घोष आणि यज्ञ-यागादी कर्मे चालू असलेली त्याला दिसायची. पृथ्वी प्रदक्षिणेमुळे सर्व प्रदेशांतील लोकांचे आकलन व्हावे आणि मानवी कल्याणासाठी त्याचा उपयोग व्हावा, यासाठी शिवाने त्याला चारही दिशांना जाण्यास सांगितले होते.

## ११. तपश्चर्येनंतर परशुराम शस्त्रविद्येत प्रवीण झाल्याचे शिवाने सांगणे

सर्वत्र जाऊन आल्यावर त्याने तपश्चयेर्ला प्रारंभ केला. तेव्हा शंकर प्रकट होऊन म्हणाला, ''हे भार्गवा, अस्त्रांच्या धारणेसाठी तू एकच शक्तीमान आणि योग्य आहेस. तुझे धैर्य आणि सात्त्विक भाव पहाता तुझ्यावर प्रसन्न होऊन मी माझे अस्त्रग्राम तुला प्रदान करतो. शस्त्रविद्येत प्रवीण झाल्यामुळे तुला तुझ्या पित्याकडे जायला हरकत नाही. तुझ्या वडिलांनी (जमदग्नींनी) तुला दिलेला दिव्य परशू लक्ष्यावर फेकला असता परतून तुझ्या हातात येईल.''

## १२. परशूमुळे भार्गवराम 'परशुराम' म्हणून प्रसिद्ध होणे

शिवाने कृपा करून ते पाणीमुक्त शस्त्र मुक्तसंधारित केले. मंत्रसामर्थ्य वापरून फेकलेले शस्त्र पुनश्च फेकणाऱ्याच्या हातात यावे, ही शिवकृपा होय. 'यापुढे हा परशू हेच तुझे उपलक्षण (प्रतीक) होईल', असे शिवाने सांगितले. त्यानंतर राम हा जमदग्नी पुत्र म्हणून 'जामदग्न्य', भृगु कुळात जन्माला आलेला म्हणून 'भार्गवराम' आणि नंतर परशू हाती आल्यामुळे 'परशुराम' या नावांनी प्रसिद्ध झाला. ब्रह्मांड पुराणानुसार सर्व शस्त्रांना मागे टाकणारा किंवा भारी पडणारा असा तो परशू होईल; म्हणून परशूला 'आत्मीय' असे म्हटले आहे.'




अक्षय तृतीया हा हिंदू धमार्तील एक सण आहे. साडेतीन मुहूर्तांपैकी एक असलेला हा दिवस सनातन धर्मात अत्यंत शुभ मानला जातो. अक्षय तृतीयेचा दिवस वैशाख महिन्याच्या शुक्ल पक्षातील तृतीयेला साजरा केला जातो. या दिवशी केलेले कोणतेही शुभकार्य अक्षय म्हणजेच अविनाशी मानले जाते. तसेच भगवान विष्णूच्या सहाव्या अवताराचे रूप असलेल्या परशुरामांचा जन्म याच दिवशी झाला असल्याने परशुराम जयंती देखील यादिवशी साजरी करतात.

अक्षय तृतीय हिंदू धमार्तील अत्यंत शुभ सण असून हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने याला शुभ दिन मानतात. यादिवशी काही वस्तू खरेदी करणे अत्यंत भरभराटीचे लक्षण मानले जाते. देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा केल्याने त्यांची कृपा यादिवशी मिळते आणि घरात सुखशांती येते समृद्धी मिळते असे मानतात. अ'ऱ्८ ळ१३८ च्या दिवशी पूजा कशी करावी, अक्षय तृतीयेचे महत्व काय आहे जाणून घेऊयात या सणाची माहिती.

**पौराणिक कथा**

धार्मिक पौराणिक कथेनुसार भगवान श्रीकृष्णांनी पांडवांना अक्षय पात्र भेट दिले होते. यामुळे त्यांना आपल्या प्रवासात उपाशी राहावे लागले नाही. कारण अक्षय या शब्दाचा अर्थच आहे अविनाशी म्हणजेच कधीही न संपणारा. यामुळे हा दिवस पवित्र मानतात कारण यादिवशी खरेदी केलेली वस्तू शुभ परिणाम देते, आयुष्यात भरभराटी घेऊन येते.

**काय खरेदी करावे**

हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक असल्याने यादिवशी शुभकार्य केली जातात. तसेच नवीन वस्तू देखील घेतात. अक्षयतृतीयेला सोने आणि चांदी घेणे अत्यंत शुभ मानले जाते. तसेच यादिवशी वास्तू खरेदी करणे सुद्धा शुभ मानतात. गृहप्रवेश केला जातो, वास्तुशांती देखील घातली जाते. नवीन गाडी अक्षयतृतीयेच्या मुहूर्तावर अनेकजण घेतात.

**दानाचे महत्व**

अक्षय तृतीयेच्या दिवशी दान करण्याला अत्यंत महत्व आहे. यादिवशी गोर गरिबांना अन्नदान करणे शुभ मानतात. तसेच पक्षांना धान्य टाकणे, गरजुंना आवश्यक वस्तू दान करणे महत्वाचे मानले जाते. यादिवशी तुम्ही कोणत्याही स्वरूपाचे दान करू शकता.

**पूजा विधी**

अक्षय तृतीयेच्या दिवशी देवी लक्ष्मी आणि विष्णूजींची पूजा करण्याची मान्यता आहे. देवी लक्ष्मीला आपण धनसंपत्तीचे प्रतीक मानतो. असे म्हणतात यादिवशी देवीची पूजा केल्याने तिची कृपा प्राप्त होऊन घरात धनसंपत्ती, समृद्धी येते. दिवाबत्ती, धूप हार फुले वाहून देवीची आराधना करावी. काहीजण कलश मांडून देखील पूजा करतात. तसेच घरात गोडाचा नैवेद्य करून तो देवाला अर्पण करावा.

वैशाख शु. तृतीयेला अक्षय्य तृतीया म्हणतात. मुळात 'अक्षय' या शब्दाचा अर्थच मुळी कधीच क्षय न पावणारे म्हणजे नाश न पावणारे असा होतो. या तिथीला साडेतीन मुहूर्ता पैकी एक शुभ मुहूर्त मानले जाते. अक्षय्य तृतीयेला 'अखा तीज' असेही म्हणतात. अक्षय्य तृतीया हा सण हिंदू आणि जैन धर्मियांनी साजरा केला जातो. हा दिवस नशीब, सौभाग्य आणि समृद्धीचा सण मानला जातो. अखंड समृद्धीचा तिसरा दिवस अशीही या दिवसाची महती आहे. या दिवशी अन्नपूर्णा (देवी) जयंती, नर–नारायण या जोडदेवाची जयंती, परशुराम जयंती, बसवेश्वर जयंती आणि, हयग्रीव जयंती असते. म्हणुनच या दिवशी त्यांचा जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो.याच दिवशी भगवान व्यास यांनी महाभारत ग्रंथाची रचना करायला प्रारंभ केला आणि त्यांचे लेखनिक म्हणून गणपतीने काम केले अशी आख्यायिका प्रचलित आहे. तसेच या दिवसापासूनच त्रेतायुगाचा प्रारंभ झाला आहे.जैन धर्मात, अक्षय तृतीयेला महत्त्व आहे कारण काही अनुयायी उसाच्या रसाने उपवास वर्षभराची तपस्या किंवा तपस्येची समाप्ती करतात. भक्त भगवान श्रीकृष्णाच्या मूतीर्ला चंदनाचा लेप लावतात, असा विश्वास आहे की यामुळे स्वर्गात प्रवेश मिळतो. या दिवशी लक्ष्मीच्या पूजेचे खूप महत्व आहे.त्यामुळे लक्ष्मी म्हणजेच धन,धान्य,संपत्ती कायम टिकून राहते अशी श्रद्धा आहे. लक्ष्मीची भागवाना पूजा करण्याचा विधी असला तरी या दिवशी विष्णूची पूजा करणे देखील फायदेशीर मानले जाते.भगवान विष्णूचे भक्त उपवास पाळून आणि गरजूंना अन्न, कपडे आणि तेल



वाटण्यासारख्या धमार्दाय कार्यात सहभागी होऊन हा प्रसंग साजरा करतात. भगवान विष्णूंना प्रिय असलेली तुळशी देवतेला अर्पण केलेल्या विविध पदार्थांमध्ये समाविष्ट केली जाते, जी नंतर प्रसाद म्हणून वाटली जाते. या दिवशी दान करणे शुभ मानले जाते. भारतातील वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये देव–देवतांना श्रद्धांजली म्हणून हा शुभ दिवस साजरा केला जातो. दिवशी व्रत करर्णायाने प्रातःकाळी स्नान करुन मनोभावे व्रतास आरंभ करावा. लक्ष्मी, विष्णु, नर नारायण यांची प्रार्थना करून नरनारायणासाठी भाजलेले जव अगर गव्हाचे पीठ, परशुरामासाठी कोवळी वाळके आणि हयग्रीवासाठी भिजवलेली हरर्बयाची डाळ घालून नैवद्य अर्पण करावा. शक्य असल्यास उपवास आणि समुद्रस्नान अथवा गंगास्नान करावे. तसेच जवस गहु, हरबरे , सातु, दहीभात , उसाचा रस दुग्धजन्य पदार्थ ( खवा, मिठाई आदी ) तसेच जलपूर्ण कुंभ, धान्य पदार्थ, सर्व प्रकारचे रस आणि उन्हाळ्यात उपयुक्त अशा वस्तुंचे दान करावे. त्याचप्रमाणे पितृश्राध्द करुन ब्राह्मणभोजन घालावे. हे सर्व यथाशक्ती करण्याने अनंत फल मिळते. या तिथीस केलेले दान, हवन आणि पितरांना उद्देशून जे कर्म केले जाते , ते सर्व अक्षय्य म्हणजेच अविनाशी आहे, असे श्रीकृष्णांनी सांगितल्याचा उल्लेख 'मदनरत्न' या ग्रंथात आहे. म्हणून या तिथीला अक्षय्य तृतीया हे नाव पडले आहे. या दिवशी पितृतर्पण करण्यास न जमल्यास निदान तिलतर्पण तरी करावे, असे आहे. या दिवसात प्रचंड उष्णता असते,म्हणून उन्हापासून रक्षण करर्णाया छत्री , वहाणा अशा वस्तु दान द्यावयाच्या असतात.त्याच प्रमाणे उन्हाळ्यात थंडगार पिण्याच्या पाण्याची पशु,पक्षी,माणसे, सर्वांनांच खूप गरज असते.म्हणून पाणी,रांजण, माठ किंवा पाणी भरून ठेवण्याच्या वस्तू दान केल्यास खूप पुण्य प्राप्त होते.माठातील पाणी थंडगार असल्याने या दिवसापासून नवीन मठातील पाणी पिण्यास आरंभ करतात. ऊसाचा रस सुद्धा पिणे,दान करणे याला या दिवशी खूप महत्व आहे.थोडक्यात शरीरातील पाण्याची गरज भागवण्याचे मोठे पुण्यअसते.म्हणूनच स्त्रियांना हा दिवस अत्यंत महत्वाचा असतो.महाराष्ट्रात महिला हळदी आणि कुंकूची देवाणघेवाण करून वैवाहिक जीवन सुसंवादी व्हावे अशी प्रार्थना करतात. शिवाय, त्या आपल्या पतींना दीघार्युष्य मिळावे म्हणून गौरी देवीची पूजा करतात. चैत्रात बसवलेल्या गौरीचे त्यांना या दिवशी विसर्जन करावयाचे असते. त्या निमित्ताने स्त्रिया हळदीकुंकू करतात.त्यावेळी सर्व थंडगार पदार्थांचा नैवेद्य चैत्रागौरीला दाखवून तो सर्व सवाष्णी, लोकांना देतात. त्यात काकडी, चंदन लेप, टरबूज, खरबूज, कैरीचे पन्हे, सरबत, बत्तासे आणि प्रोटीन्स ,फायबरससुद्धा शरीरासाठी गरजेचे असल्यामुळे हरभरे, कैरी, आंबेडाळ असे विविध पदार्थ सर्वांना खाण्यास देतात. याच बरोबर या दिवशी गोडाधोडाचे,पुरणाचे जेवण बनवून पितरांना अन्न,पाणी अर्पण केले जाते. त्यांनाही तृप्त करून त्यांचा आशीर्वाद घेतात. अक्षय्य तृतीयेशी जोडलेल्या दंतकथा या शुभ दिवसाशी अनेक आख्यायिका गुंतलेल्याआहेत, परंतु सर्वात महत्त्वाची गोष्ट देवीअन्नपूणाभीवती फिरते. शास्त्रांनुसार, देवी पार्वतीचा अवतार असलेली देवी अन्नपूर्णा, अक्षय तृतीयेच्या या आनंददायी प्रसंगी भुकेल्यांना उदारतेने अन्न देण्यासाठी प्रकट झाली. यासंबंधी अशी आख्यायिका आहे की, भगवान शिव भिकाऱ्याच्या वेशात अन्नपूर्णेला भेट देऊन अन्नाची मागणी करतात. विश्वाच्या स्वामीला अन्नाची भिक्षा का मागावी लागली असा प्रश्न पडू शकतो. हे कृत्य मानवतेला आध्यात्मिक आठवण करून देणारे होते, कारण देव प्रत्येक जीवात राहतो म्हणून गरीबांना अन्न देण्याचे महत्त्व सांगितले जाते. या शुभ दिवशी देवीने स्वतः भगवान शिवालाच अन्न दिले म्हणून या दिवशी अन्नदान, वस्त्रदान याला खूपच महत्व आहे.या दिवशी कोणत्याही प्रकारचे कर्ज काढू नये कारण ते देखील अक्षय टिकून राहते अशी लोकांची श्रद्धा आहे.शास्त्रांनुसार, हा दिवस देवाने विश्वाच्या निर्मितीचे प्रतीक आहे. उत्तर प्रदेशातील वृंदावनातील बांके बिहारी मंदिरात एक अनोखी परंपरा पाळली जाते, जिथे आशीर्वाद घेण्यासाठी देवतेचे चरण जनतेसमोर उघडले जातात.ओरिसामध्ये, प्रसिद्ध रथयात्रेसाठी रथांच्या बांधकामाची सुरुवात याच मंगलदिनापासून केली जाते. हा दिवस साडेतीन शुभमुहूतार्पैकी असल्यामुळे कोणत्याही मंगल कार्य ,शुभ कार्यांची सुरुवात, छोट्या ,मोठ्या वस्तू,सोने, वाहने,वास्तू यांची खरेदी खूप मोठ्याप्रमाणावर केली जाते.कारण ती अखंड टिकते,आणि लाभते अशी मानता आहे.


**सर्वांना ही अक्षय तृतीया सुख,शांती, समाधान, भरभराटीची, उत्तम आरोग्यासह दीघार्युष्य देणारी लाभावी हिच लक्ष्मी -विष्णु चरणी प्रार्थना.**

# मुंबईच्या वेशीवर नव्या शहरासाठी 124 गावातील जमिनी जाणार

# भूखंडधारकांना कसा मिळणार मोबदला... टक्केवारी ठरली

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मुंबईला जागतिक दर्जाचं शहर करण्यासाठीच्या कार्यामध्येच शहरालगतच्या भागांचाही सर्वांगीण विकास शासनानं हाती घेतला आहे. नवी मुंबई आणि उपनगरांमध्ये याच विकासाच्या खुणा दिसत असून येत्या काही वर्षांत मुंबईच्या कक्षा रुंदावण्यासोबतच जागतिक दर्जाची उपशहरं, किंबहुना तिसरी मुंबईसुद्धा संपूर्ण जगाचं लक्ष वेधणार यात शंका नाही. सध्या याच तिसऱ्या मुंबईच्या अनुषंगानं मुंबईच्या वेशीवरच अनेक पायाभूत सुविधांचा विकास हाती घेण्यात आला आहे. यातीलच महत्त्वाचा टप्पा म्हणजे तिसऱ्या मुंबईसाठीचं भू- संपादन. ही प्रक्रिया आता सुरू होत असून, एमएमआरडीएकडून ऑनलाइन पद्धतीने जमीन मालकांची संमती घेतली जाणार असून, 27 एप्रिलपासून या प्रत्यक्ष प्रक्रियेला सुरुवात होत आहे.




**कुठं साकारली जात आहे तिसरी मुंबई?**
मुंबई आणि नवी मुंबईला जोडणाऱ्या देशातील सर्वात मोठा सागरी सेतू अशी ओळख असणाऱ्या अटल सेतू प्रकल्पाच्या प्रभाव क्षेत्रात ही तिसरी मुंबई उभी राहणात आहे. या डोळे दीपवणाऱ्या शहरासाठी भूसंपादनाची प्रक्रिया मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण म्हणजेच एमएमआरडीएनं सुरु केली आहे. या प्रक्रियेनुसार भूसंपादनासाठी जमीन मालकांची प्रत्यक्ष संमती घेण्याची प्रक्रिया 27 एप्रिलपासून सुरु होईल अशी माहिती आहे. या प्रक्रियेअंतर्गत ऑनलाइन अर्ज संकेतस्थळावर उपलब्ध करून दिला जाणार आहे.

### 124 गावांमधील जमिनी जाणार...

अटल सेतूच्या नवी मुंबईकडील प्रभाव क्षेत्रात रायगड जिल्ह्यातील उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील तब्बल 124 गावांचा समावेश असून त्यातील साधारण 323.44 चौ. किमी भूखंड या तिसऱ्या मुंबईसाठी वापरात येणार आहे. 16 मार्चरोजीच यासाठी राज्य सरकारने भूसंपादन- भूवाटप धोरण जाहीर केलं होतंय सदर धोरणानुसार प्रकल्पग्रस्तांना सिडको आणि एमआयडीसीच्या तरतुदींअंतर्गत 22.5% विकसित भूखंडाचा परतावा देण्यात येईल. हा परतावा/ मोबदला रोख भरपाई किंवा एफएसआय/टीडीआर स्वरूपात देण्यात येईल.

### कुणाला किती भूखंड वाटप ?

उरण, पनवेल तालुक्यातील जमीन मालकांना 22.5 टक्के विकसित भूखंडाचं वाटप उरण तालुक्यात करण्यात येईल. तर पेण तालुक्यातील जमीन मालकांना 22.5 टक्के विकसित भूखंड त्याच तालुक्यात देण्यात येणार आहे. ऑनलाईन प्रक्रियेमुळे भू-संपादनाची प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याचा मानस असून, जमीन मालकांना आवश्यक कागदपत्रांसह ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे. या नव्या प्रक्रियेमुळे भू-संपादन प्रक्रियेला वेग मिळणार असून, त्यामुळं प्रक्रियेतील विलंब कमी होऊन वादही कमी होतील अशी अपेक्षा यंत्रणेनं ठेवत नियोजित पद्धतीने नवीन शहर उभारणी शक्य होईल, असा दावा एमएमआरडीएनं केला.

### कशी असेल तिसरी मुंबई ?

तिसरी मुंबई उभारत असताना प्रामुख्यानं लोककेंद्रित विकासाला प्राधान्य दिलं जाईल. मुळात शहर निर्मिती नागरिकांच्या सहभागातूनच व्हावी, या विश्वासातून जमीनमालकांना सध्या विविध पर्याय दिले जात असून या शहराच्या निर्मितीचं यश त्यांच्यावर अवलंबून असल्याची बाब एमएमआरडीएचे महानगरआयुक्त संजय मुखर्जी यांनी स्पष्ट केली. अटल सेतू, नवी मुंबई विमानतळ, मेट्रोची जोडणी आणि मुंबई पुण्याच्या जोडणाऱ्या एस्क्प्रेवेची जोडणी अशा अनेक मार्गांनी ही तिसरी मुंबई जोडली जाणार असल्यामुळं येत्या काळात हे शहर नेमकं कसं दिसेल हे पाहणंसुद्धा एक परवणीच असेल.

## पुण्यात लढाऊ विमानाचे अचानक लँडिंग
## करावे लागले चक्क विमानतळ बंद



■पुणे। प्रतिनिधी,

विमानाचा अपघात आता रस्ते अपघातासारखा सर्वसाधारण झालाय. काल पुण्याच्या धावपट्टीवर रात्री एक लढाऊ विमानाचे लँडिंग झाले आणि अचानक संपूर्ण रनवे च बंद करण्यात आला. सुदैवाने मोठा अपघात होता होता टळला.

पुण्याचा विमानतळ हवाई दल आणि नागरी विमानांच्या वापरासाठी वापरला जातो. शुक्रवारी रात्री १०.२५ च्या सुमारास भारतीय हवाई दलाच्या एका लढाऊ विमानाचे पुण्याच्या विमानतळावर हार्ड लँडिंग झाले. विमानाच्या गिअर यामध्ये तांत्रिक बिघाड झाला, यामुळे विमानाला मोठा धक्का बसला. विमान धावपट्टीला घासले आणि मोठी आग लागली . सुदैवाने वैमानिक सुरक्षित असून कोणत्याही नागरी मालमत्तेचे नुकसान झालेलं नाही.

केंद्रीय नागरी हवाई वाहतूक मंत्री मुरलीधर मोहोळ यांनी विमानतळावरील धावट्टीवरील कामकाज थांबवण्यात आल्याची पुष्टी केली. एक्स वर पोस्ट करताना मोहोळ म्हणालेत की, "सुदैवाने विमानातील कर्मचारी सुरक्षित आहेत आणि कोणत्याही नागरी मालमत्तेचे नुकसान झालेले नाही विमान कंपन्यांना माहिती देण्यात आली असून धावपट्टीवरील कामकाज पूर्ववत होण्यासाठी काही तास लागू शकतात, परिस्थिती लवकरात लवकर नियंत्रणात यावी यासाठी मी विमानतळ संचालक आणि हवाई दलाच्या अधिकाऱ्यांच्या सतत संपर्कात आहे.

## रक्तदाब घटला, झटके आले अन्... धुळ्यातील अविवाहित तरुणीचं गर्भपात प्रकरण उघड

**गर्भपाताच्या गोळ्या पुरवणारे 'रॅकेट' रडारवर?**
या मृत्यूने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. २४ आठवड्यांचा (सहा महिने) गर्भ असताना गर्भपातासाठी आवश्यक असणारी घातक औषधे या तरुणीला कोणी उपलब्ध करून दिली? यामागे एखादे अनधिकृत रॅकेट सक्रिय आहे का? आणि त्या संबंधित तरुणाचा या संपूर्ण प्रकरणात काय सहभाग आहे? या दिशेने पोलिसांनी आपला तपास केंद्रित केला आहे. ही औषधे बेकायदेशीररीत्या विकली गेली असल्यास, संबंधित औषध विक्रेते किंवा मध्यस्थांवर कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. पोलिसांच्या या सखोल तपासानंतरच या प्रकरणातील गूढ उकलणार आहे.

■धुळे। प्रतिनिधी,

धुळे शहरालगतच्या एका गावातून एक हृदयद्रावक घटना समोर आली आहे. लग्नाआधीच गरोदर राहिलेल्या एका १८ वर्षीय तरुणीने स्वतःहून गर्भपाताचा प्रयत्न केला, जो तिच्या जीवावर बेतला. गर्भपातासाठी आवश्यक असलेल्या औषधांचे प्रमाणाबाहेर सेवन केल्यामुळे या तरुणीचा मृत्यू झाला असून, या घटनेने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी सहा महिन्यांची (२४ आठवडे) गरोदर होती. ही बाब लपवण्यासाठी तिने डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय गर्भपाताच्या गोळ्या घेतल्या. औषधांच्या अतिसेवनामुळे तिची प्रकृती खालावली आणि तिला रक्तदाब कमी होऊन झटके येऊ लागले. कुटुंबीयांनी तिला तातडीने देवपुरातील एका खाजगी रुग्णालयात नेले, जिथे ती गरोदर असल्याचे आणि तिने औषध घेतल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तिला पुढील उपचारासाठी हिरे शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात हलवण्यात आले, मात्र उपचारादरम्यान तिची प्राणज्योत मालवली. या प्रकरणी मोहाडी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून, पोलीस पुढील तपास करत आहेत. वैद्यकीय सल्ल्याशिवाय घेतलेली औषधे किती घातक ठरू शकतात, हे या दुर्दैवी घटनेने पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे.




### नेमकी घटना काय ?

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, संबंधित तरुणीची तब्येत अचानक बिघडल्याने तिला तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले होते. मात्र, डॉक्टरांनी केलेल्या सखोल तपासणीत ती तरुणी सहा महिन्यांची (२४ आठवडे) गरोदर असल्याचे उघड झाले. विशेष म्हणजे, हा गर्भ पाडण्याच्या उद्देशाने तिने डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय काही जहाल औषधांचे सेवन केले होते. या औषधांच्या दुष्परिणामांमुळे तिची प्रकृती अधिकच खालावली. डॉक्टरांनी ही गंभीर बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास आणून दिली, मात्र दुर्दैवाने उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. या घटनेमुळे अनधिकृतपणे घेतल्या जाणाऱ्या गर्भपाताच्या गोळ्यांच्या धोक्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

### रुग्णालयात मृत्यूशी झुंज अपयशी

गर्भपातासाठी घेतलेल्या औषधांचा शरीरावर विपरीत परिणाम झाल्याने एका १८ वर्षीय तरुणीला आपला जीव गमवावा लागला आहे. औषधांच्या अतिप्रमाणामुळे तिची शारीरिक स्थिती कमालीची बिघडली आणि उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. संबंधित तरुणीने घेतलेल्या गर्भपाताच्या गोळ्यांमुळे तिच्या शरीरातील रक्तदाब अचानक कमालीचा घटला. रक्तदाब खालावल्याने तिला तीव्र झटके येऊ लागले आणि तिची शुद्ध हरपली. प्रकृती चिंताजनक होत असल्याचे पाहून डॉक्टरांनी तिला तातडीने हिरे शासकीय रुग्णालयातील अतिदक्षता विभागात हलवण्याचा सल्ला दिला. तिथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या पथकाने तिला वाचवण्याचे शर्थीचे प्रयत्न केले, मात्र औषधांच्या विषबाधेमुळे शरीराने उपचारांना प्रतिसाद देणे बंद केले होते. अखेर मृत्यूशी सुरू असलेली तिची ही झुंज अपयशी ठरली. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पोलिसांनी उधळला एलपीजी सिलिंडरचा काळा बाजार करण्याचा डाव

■ठाणे। प्रतिनिधी,

पश्चिम आशियात युद्ध सुरू झाल्यापासून देशात ठिकठिकाणी एलपीजी सिलिंडरची कृत्रिम टंचाई निर्माण करून काळाबाजार सुरू करण्याचे प्रयत्न चालले आहे. केंद्र सरकार आणि राज्य सरकारांनी पोलीस तसेच प्रशासनाच्या सहकार्याने हे प्रयत्न अयशस्वी करण्यासाठी विशेष मोहिम हाती घेतली आहे. या मोहिमेला ठाण्यात मोठे यश मिळाले. ठाणे पोलिसांनी धडक कारवाई केली. एका गोदामातून एलपीजी सिलिंडरचा बेकायदेशीररित्या ठेवलेला मोठा साठा जप्त केला. हा साठा जप्त करून पोलिसांनी एलपीजी सिलिंडरचा काळा बाजार करण्याचा डाव उधळला. ठोस माहिती मिळताच ठाण्यातील चितळसर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील वरुडे यांच्या मार्गदर्शनात पोलिसांनी धडक कारवाई केली. कापूरबावडी परिसरात डॉमिनोज जवळ असलेल्या एका गोदामात पोलिसांनी तपासणी केली. या गोदामात एलपीजी सिलिंडरचा बेकायदेशीररित्या ठेवलेला मोठा साठा आढळला. हा साठा पोलिसांनी कायदेशीर कारवाई करून जप्त केला. पोलिसांनी जप्त केलेले सिलिंडर काळाबाजार करून चढ्या दराने विकण्याच्या हेतूने गोदामात बेकायदेशीररित्या ठेवले होते. या प्रकरणी तपास सुरू असून दोषींवर कायदेशीर कारवाई केली जाईल, अशी माहिती पोलीस सूत्रांनी दिली आहे. अमेरिका आणि इस्रायल यांनी २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराण विरोधात युद्धाला सुरुवात केली. युद्धाला सुरुवात होताच इराणने त्यांच्या देशाच्या अतिशय जवळ असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीवर कठोर नियंत्रण ठेवायला सुरुवात केली. भारत आयात करत असलेल्या गॅस, कच्चे तेल आदी ऊर्जेशी संबंधित मालाची सुमारे २० टक्के वाहतूक होर्मुझमार्गे होते. यामुळे युद्धाचा फटका भारताला बसेल असे वातावरण सुरुवातीला काही जणांनी निर्माण केले. अफवा पसरवून सिलिंडर, इंधन यांची साठेबाजी करून काळाबाजार करण्याचे नियोजन सुरू केले. पण केंद्र सरकार वेळीच सावध झाले. एकाचवेळी आंतरराष्ट्रीय पातळीवर आणि देशांतर्गत वेगवेगळ्या पातळ्यांवर समन्वय ठेवून सरकारने टंचाईचे मोठे संकट निर्माण होणार नाही याची खबरदारी घेतली. साठेबाजी करणाऱ्यांना शोधून बेकायदेशीररित्या केलेला साठा जप्त करायला सुरुवात केली. या मोहिमेंतर्गत ठाण्यातील चितळसर पोलिसांनी कापूरबावडी परिसरात डॉमिनोज जवळ असलेल्या एका गोदामावर धाड टाकली. धाड टाकून पोलिसांनी एलपीजी सिलिंडरचा काळा बाजार करण्याचा डाव उधळला. या प्रकरणात धरपकड सुरू आहे.

# नालासोपाऱ्यात धक्कादायक प्रकार!

## सासरच्या मंडळींकडून महिलेला बेदम मारहाण, घटना सीसीटीव्ही मध्ये कैद

■वसई। प्रतिनिधी,

वसई-विरार परिसरातील नालासोपारा पूर्व येथे एक धक्कादायक घटना समोर आली आहे. शांती लाईफ या इमारतीत एका महिलेला तिच्याच सासरच्या मंडळींकडून बेदम मारहाण करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. विशेष म्हणजे हा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे. सदर महिलेच्या म्हणण्यानुसार, सासू, सासरे, दोन नणंद, देवर आणि नणंदेचे पती असे कुटुंबीय गेल्या 13 वर्षांपासून हुंड्याच्या पैशांसाठी तिला त्रास देत असून वारंवार मारहाण करत आहेत.




### या घटनेमुळे परिसरात संताप

नालासोपारा पूर्व येथील शांती लाईफ इमारतीमध्ये राहणाऱ्या एका महिलेवर तिच्याच सासरच्या मंडळींकडून मारहाण करण्यात आल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. सदर महिलेच्या म्हणण्यानुसार, सासू, सासरे, दोन नणंद, देवर आणि नणंदेचे पती असे कुटुंबीय गेल्या 13 वर्षांपासून हुंडा देण्याच्या मागणीसाठी तिला त्रास देत असून वारंवार मारहाण करत आहेत. महिला तिच्या पती आणि लहान मुलीसह त्याच इमारतीतील वेगळ्या फ्लॅटमध्ये राहत असून, ती शिक्षक म्हणून काम करते आणि घरातच मुलांना शिकवणी देते. मात्र, या कुटुंबीयांनी थेट तिच्या विद्यार्थ्यांसमोरच तिच्यावर हल्ला केल्याचा आरोप असून, या घटनेमुळे परिसरात संताप व्यक्त केला जात आहे.

गेल्या 13 वर्षांपासून हुंडा देण्याच्या मागणीसाठी तिला त्रास देत असून वारंवार मारहाण करत आहेत. महिला तिच्या पती आणि लहान मुलीसह त्याच इमारतीतील वेगळ्या फ्लॅटमध्ये राहत असून, ती शिक्षक म्हणून काम करते आणि घरातच मुलांना शिकवणी देते. दरम्यान, या घटनेमुळं संताप व्यक्त होत आहे.

**संपूर्ण प्रकार इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद**
या मारहाणीचा संपूर्ण प्रकार इमारतीतील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, त्याचे फुटेज आता समोर आले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून मला हुंडा देण्याच्या कारणावरून त्रास दिला जात आहे. आता त्यांनी थेट माझ्या विद्यार्थ्यां समोरच मला मारहाण केली आहे. आतापर्यंत हे सगळं घरात होतं, तोपर्यंत मी सहन करत होते. पण आता ते घराबाहेरही मला बिनधास्त मारहाण करत आहेत. माझ्या जीवाला धोका आहे. कोर्टात केस सुरू आहे. यूपी आणि मुंबई दोन्हीकडे. तरीही त्यांना कुठलीही भीती नाही. मला न्याय हवा आहे अशी माहिती या महिलेने दिली आहे. या घटनेनंतर संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे. पोलिसांनी या प्रकरणात नेमकी काय कारवाई केली आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नालासोपारात किरकोळ वादातून पूर्वेत तुफान हाणामारी




■नालासोपारा। प्रतिनिधी,

नालासोपारा पूर्व येथील शिवशक्ती हॉटेल परिसरात दोन गटांमध्ये जोरदार हाणामारी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे ही मारामारी पोलिसांच्या उपस्थितीतच झाल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, काही किरकोळ वादातून दोन गटांमध्ये सुरुवातीला बाचाबाची झाली. हा वाद वाढत जाऊन त्याचे रूपांतर हाणामारीत झाले.

**दोन्ही गटातील तरुणांनी एकमेकांवर हात उगारला, परिसरात गोंधळाचं वातावरण**
दोन्ही गटातील तरुणांनी एकमेकांवर हात उगारत परिसरात गोंधळ निर्माण केला. घटनास्थळी पोलिस उपस्थित असतानाही काही काळ परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेल्याचे पाहायला मिळाले. नागरिकांनी या घटनेचा व्हिडिओ मोबाईलमध्ये कैद केला असून तो सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. या प्रकरणी पोलिसांनी काही जणांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. परिसरात तणावपूर्ण शांतता असून अतिरिक्त पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

## आयपीएल सट्टेबाजीचा मोठा पर्दाफाश

### ४० लाखांची रोकड जप्त, 'दुबई कनेक्शन'ने पोलीस चक्रावले!



■नागपूर। प्रतिनिधी,

आयपीएलच्या रणधुमाळीत नागपूर शहरात सट्टेबाजीचे जाळे वेगाने पसरल्याचे समोर आले आहे. प्रतापनगर पोलिसांनी आयटी पार्क परिसरातील एका फ्लॅटवर धाड टाकून तब्बल ४० लाख रुपयांची रोख रक्कम जप्त केली असून, या कारवाईमुळे सट्टा बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. या प्रकरणाचे धागेदोरे थेट दुबईपर्यंत पोहोचले असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

### नेमकी कारवाई काय ?

अंबाझरी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील एका फ्लॅटमध्ये ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून आयपीएल सामन्यांवर सट्टा लावला जात असल्याची गुप्त माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचून धाड टाकली. या कारवाईत ४० लाखांच्या रोकडसह सट्टेबाजीसाठी वापरले जाणारे साहित्य जप्त करण्यात आले आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी अमन पाठक याला गुन्हे शाखेने यापूर्वीच त्याच्या इतर साथीदारांसह अटक केली होती. अमन पाठकची कसून चौकशी केली असता, या संपूर्ण रॅकेटचा मास्टरमाइंड 'एस. के.' नावाचा इसम असल्याचे समोर आले आहे. 'एस.के.' च्या सूचनेनुसारच नागपुरात भाड्याने फ्लॅट घेऊन हे केंद्र चालवले जात होते. ऑनलाइन ॲपच्या माध्यमातून हा सर्व काळाबाजार सुरू होता.

### दुबई कनेक्शन उघड

पोलिसांच्या प्राथमिक तपासात या रॅकेटचे कनेक्शन आंतरराष्ट्रीय स्तरावर असल्याचे स्पष्ट झाले आहे. दुबईतून या सट्टेबाजीच्या व्यवहारांचे नियंत्रण केले जात असल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. यामुळे या प्रकरणात आता अंमलबजावणी संचालनालय किंवा इतर तपास यंत्रणांची मदत घेतली जाते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## प्रेम, आंतरजातीय लग्न आणि सर्व्हिस रिव्हॉल्वरने मर्डर...

# पोलीस उपनिरीक्षकाचं महिला अधिकाऱ्याबरोबर अफेअर

■मुंबई। प्रतिनिधी,

बिहारच्या मुंगेर जिल्ह्यात एका पोलीस उपनिरीक्षकाने स्वतःच्याच पत्नीची गोळ्या झाडून हत्या केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी आरोपी उपनिरीक्षक चंदन कुमार याला अटक करून त्याची रवानगी तुरुंगात केली आहे. शनिवारी उशिरा संध्याकाळी एका भाड्याच्या खोलीत सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून गोळी झाडल्याने मधु कुमारी हिचा मृत्यू झाला होता. सुरुवातीला हा आत्महत्येचा प्रकार असल्याचे भासवण्यात आले होते, परंतु मृतदेहाची स्थिती आणि कुटुंबाने लावलेले आरोप यामुळे या प्रकरणाला हत्येचे वळण मिळाले. 3 डॉक्टरांच्या पथकाने मृतदेहाचे विच्छेदन केल्यानंतर तो नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला आणि मुंगेरमधील स्मशानभूमीत तिच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. मृत महिलेचे वडील रणजित कुमार यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी त्वरित कारवाई केली असून ही घटना बिहारमधील मुंगेर जिल्ह्याच्या सफिया सराय पोलीस स्टेशन हद्दीत घडली आहे.

### प्रेमविवाह आणि विवाहबाह्य संबंधांमुळे झालेली संघर्षाची सुरुवात

मधु आणि चंदन यांच्यामधील ही कहाणी प्रेमविवाहापासून सुरू झाली होती.



मिळालेल्या माहितीनुसार, या दोघांमध्ये गेल्या 11 वर्षांपासून प्रेमसंबंध होते. शिक्षण घेत असतानाच त्यांची ओळख झाली होती आणि वेगळ्या जातीचे असल्याने सुरुवातीला कुटुंबीय लग्नासाठी तयार नव्हते. मात्र, चंदनला पोलीस दलात नोकरी लागल्यानंतर मधुने आपल्या कुटुंबाची समजूत काढली आणि अखेर 7 फेब्रुवारी 2025 रोजी या दोघांचा आंतरजातीय विवाह पार पडला. लग्नानंतर काही काळातच त्यांचे सुखी आयुष्य वादाच्या भोवऱ्यात अडकले. चंदनचे बरियारपूर पोलीस ठाण्यात तैनात असताना एका महिला उपनिरीक्षकाशी प्रेमसंबंध असल्याची धक्कादायक माहिती मधुला मिळाली होती. याच कारणावरून पती-पत्न ीमध्ये सतत भांडणे होऊ लागली. मधुने चंदनला त्या महिलेपासून दूर राहण्यास वारंवार सांगितले होते, परंतु यामुळे त्यांच्यातील वाद मिटण्याऐवजी अधिकच विकोपाला गेले होते.

### हुंडाबळी आणि अवैध संबंधांच्या आरोपांनी प्रकरणाला वळण

काही महिन्यांपूर्वी त्या महिला उपनिरीक्षकाची बदली दुसऱ्या पोलीस ठाण्यात झाली, तर चंदनला देखील बरियारपूरवरून हटवून सफिया सराय येथे पोस्टिंग देण्यात आले. गेल्या 3 महिन्यांपासून मधु आपल्या माहेरून परतली होती आणि पतीसोबत सफिया सराय येथे राहू लागली होती. घटनेच्या 10 दिवस आधीच ती आपल्या घरून परतली होती. घटनेच्या दिवशी देखील या दोघांमध्ये कडाक्याचे भांडण झाल्याचे समोर आले आहे. त्यानंतर उशिरा संध्याकाळी सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून गोळी सुटल्याचा आवाज आला आणि मधुचा जागीच मृत्यू झाला. मृत महिलेच्या वडिलांचा आरोप आहे की, चंदनचे त्या महिला उपनिरीक्षकाशी असलेले अवैध संबंध आणि हुंड्यासाठी केलेला छळ यामुळेच ही हत्या करण्यात आली आहे. चंदन मधुवर स्वतः नोकरी करण्यासाठी देखील दबाव टाकत होता आणि नोकरी लागल्यानंतर त्याच्या वागण्यात मोठा बदल झाला होता, असे कुटुंबाने आपल्या निवेदनात स्पष्टपणे नमूद केले आहे.

**पोलिसांकडून सर्व्हिस रिव्हॉल्व्हर जप्त आणि सखोल तपास सुरू**
मुंगेरचे पोलीस अधीक्षक सय्यद इमरान मसूद यांनी या प्रकरणाला दुजोरा देताना सांगितले की, आरोपी उपनिरीक्षक चंदन कुमारला अटक करण्यात आली असून त्याच्यावर हुंडाबळी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हत्येसाठी वापरलेले सर्व्हिस रिव्हॉल्व्हर पोलिसांनी जप्त केले असून एफएसएल (ऋछ) टीमने घटनास्थळावरून सर्व आवश्यक पुरावे गोळा केले आहेत. पोलीस आता या प्रकरणाची सर्व बाजूंनी चौकशी करत असून ज्या महिला उपनिरीक्षकावर अवैध संबंधांचे आरोप लावले जात आहेत, तिचा या गुन्ह्यात काय सहभाग आहे का, याचाही शोध घेतला जात आहे. आरोपीला कठोर शिक्षा व्हावी अशी मागणी पीडितेच्या वडिलांनी केली असून पोलीस अहवाल आणि फॉरेन्सिक पुराव्यांच्या आधारे पुढील कायदेशीर कारवाई केली जाईल. या घटनेने पोलीस दलाची प्रतिमा मलीन झाली असून एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याने अशा प्रकारे कायदा हातात घेतल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com